# ‘आज्ञापत्र‘
# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनातील प्रत्यक्ष राज्यघटना
## (मराठ्यांची राज्यव्यवस्थेतील प्रशासकीय कार्ययंत्रणा)

**श्री. नंदकिशोर रमाकांत एकबोटे**

महाराष्ट्राच्या इतिहासात सतराव्या शतकात पूर्वार्धामध्ये मराठी सत्तेचा उदय झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उत्तरेकडील मुघल सत्ताधीश विजापूरची आदिलशाही, कोकणातील सिद्दी, गोव्यातील पोर्तुगीज व ठिकठिकाणी वसाहत करून राहिलेले इंग्रज यांच्याशी अविरत संघर्ष करून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. ‘लोककल्याण आणि स्वधर्म रक्षण’ हा राज्याचा पाया होता. (इ.स. १६३० ते १६८० हा शिवकाल मानला जातो.)

प्रशासन करताना शिवछत्रपती यांनी फक्त मराठी मुलूखावरचं राज्य केले, असे म्हणणे अर्ध सत्य ठरेल. **शिव छत्रपतींनी मराठी मनावर पण कायमस्वरूपी राज्य केले.** असे आजही जाणवते, शिवकाळात (इ.स. १६३० ते १६८०) देशमुखी अस्तित्वात होती, वतनदार कुलकर्णी-देशपांडे होते, आडनावे अनेक वेळेस गावांवरून पडत असत. उदा. सातारकर, पैठणकर, करमाळकर, मावडीकर, मालढणपूरकर. त्याचप्रमाणे पदांवरून ही आडनावे निर्माण झाली. उदा. सरसेनापती, सरनौबत, पाटील, देशमुख, चिटणीस, सबनीस, फडणीस, पोतनीस, कारखानीस, पंतसचिव, पंतप्रतिनिधी शिवकाळी आदिलशाही, निजामशाही, बेदरशाही, कुतुबशाही बरोबरच दिल्लीच्या बादशहा हे मुस्लिम राज्यकर्ते नेहमी आपापसात डावपेच (राजकीय) सत्ता वाढविण्यात करीत असे.[१] बहुतांशी राज्य मुस्लिमांनी करायचे व मांडणे स्थानिक मराठा सरदारांमध्ये व्हायची म्हणजे आपणच आपल्या राज्यातील लोकांशी भांडायचे, मारायचे. हे कोणासाठी करायचे तर एखाद्या आदिलशाह, निजाम, मोंगल राज्याच्या राज्य विस्तारासाठी म्हणजे मरायचे आम्ही व राज्य करायचे परकीयांनी अशी स्थिती होती, शिवरायांनी ही परिस्थिती बदलण्याकरिता अवघे आयुष्य खर्च केले. शंभुरायांनी स्वत: यातना सहन करीत बलीदान केले. राजारामांनी स्वकीय एकत्र यावेत म्हणून स्वत: कर्तेपण घेऊन प्रयत्न केले व **मराठा मंडळ** स्थापन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र्य राज्याच्या निर्मितीबरोबर राज्य प्रशासन बळकट होण्याकरिता अनेक सक्षम विचारवंत, योध्दे, मुत्सद्दी, व्यवहार कुशल, गुप्तहेरगीर करणारे, प्रशासन चालवणारे, करारी, कर्तबगार अशी माणसे पारखून त्यांचे अष्टप्रधान मंडळ बनविले. त्यात फक्त गुणवत्तेला, निष्ठेला व स्वराज्य प्रेमाला स्थान होते. त्यांनी म्हणून अष्टप्रधानांची नेमणूक केली. संभाजी महाराजांनी सुध्दा हीच पध्दत चालू ठेवली होती. तिच पद्धत छत्रपती राजाराम चालू ठेवत असताना मोगलांच्या ससेमिऱ्यामुळे जिंजीला महाराजांना स्वसंरक्षणार्थ जावे लागले. त्याकाळात महाराष्ट्राची राज्यव्यवस्था नीट चालावी म्हणून **मराठा मंडळाला** छत्रपती राजारामांना कार्यान्वित केले. एकूणच प्रशासन व्यवस्था करताना प्रामुख्याने आपल्याकडे असलेल्या राज्यांची भौगोलिक स्थिती, आर्थिक स्थिती, धार्मिक स्थिती व प्रशासनाच्या कक्षेत येणाऱ्या क्षेत्रफळाच्या आकारमानानुसार त्यांची केलेली विभागणी व त्यावरील अधिकारी व्यक्तीची नेमणूक केली.

साताऱ्याची गादीकरिता छ. थोरले शाहू महाराज (छ. संभाजी पुत्र) यांनी अष्टप्रधान मंडळ नेमण्यापूर्वी महाराष्ट्रात बऱ्याच घडामोडी घडत होत्या, छ. संभाजी महाराज यांच्या बलिदानानंतर छ. राजाराम १५ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीस पोहचले. त्यावेळी संभाजी महाराजांनी जे अष्टप्रधान नेमले होते, त्यामध्ये त्यांच्या बलिदानामुळे स्वराज्यात काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. छ. संभाजी महाराजांनी जेव्हा राज्याभिषेक करून जेव्हा राज्यारोहण केले, त्यावेळी छ. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील काही महत्त्वाच्या मंडळींवर राजद्रोह अशा स्वरूपाचा आरोप करून त्यांना मारून टाकले व काही नवीन नेमणूका केल्या. पुढे छ. राजारामांच्या काळात शुर मुत्सदी सरदारांच्या नेमणूका अष्टप्रधान मंडळात करून प्रशासकीय कार्ययंत्रणा बसविण्याचा चांगला प्रयत्न केला, २ मार्च १७०० या दिवशी छ. राजारामांचे सिंहगडावर महानिर्वाण झाले. त्यानंतर महाराणी ताराबाई यांनी राज्य सांभाळले. छ. राजारामांच्या प्रेरणेतून चालू झालेले मराठा मंडळ यांनी प्रशासकीय कार्यामध्ये नियोजन करून राज्य

सांभाळण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले व हे कार्य चालू असतानाच इ. स. १७०७ मध्ये छ. शाहू यांचे आगमन झाले. महाराणी ताराबाई व छ. शाहू यांच्यात राजकीय स्वरूपाची भांडणे झाली. हे सर्वांनाच ज्ञात आहे. छ. शाहू यांनी सातारा येथे राज्यारोहण केल्यानंतर परत नवीन अष्टप्रधान मंडळ तयार झाले. एकंदर अष्टप्रधान मंडळाचे मागील २० वर्षांत तीन वेळा स्थित्यांतर झाले. छ. थोरले शाहू महाराज यांनी सुध्दा अष्टप्रधान मंडळ नेमले.

राज्य चालविताना जे काही नियम, धोरणे व बारीकसारीक तपशील सदैव ध्यानात ठेवावे लागत असत. हे सर्व अत्यंत सूक्ष्म व मार्मिक पध्दतीने त्या-त्या कार्यात राहून व दूरदृष्टीने धोरणे कशी असावीत, म्हणजेच प्रशासन चालविण्याकरिता यंत्रणा कशी होती हे रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेल्या राज्यघटनेवरून लक्षात येते.[२]

**आज्ञापत्र**

**संकल्पना :-** आज्ञापत्र म्हणजे प्रशासन यंत्रणाच होती. किंबहुना छ. शिवाजी महाराजांच्या मनातील शासन यंत्रणा चालविण्याचा कार्यभार ज्यांनी उचलला, त्या प्रशासन यंत्रणेतील त्यांचे मन जाणणाऱ्या अमात्य या अष्टप्रधान मंडळातील अत्यंत जबाबदार व मुत्सद्दी व्यक्ती रामचंद्रपंत यांनी अंदाजे इ. स. १७१५ मध्ये लिहून काढले. परंतु छ. संभाजी महाराज, छ. राजाराम महाराज, तसेच महाराणी ताराबाई व शंभू पुत्र शाहू महाराज - थोरले यांनी जे प्रशासन चालविले ते सर्व या आज्ञापत्रात प्रतिबिंबीत आहे. हे आज्ञापत्र म्हणजे **मराठ्यांची राजघटना व प्रशासकीय राज्यपद्धती राबविण्याची एक पद्धत होती.** या आज्ञापत्रात एकंदर नऊ प्रकरणात विभागलेले आहे. त्यामध्ये पहिले दोन प्रकरण हे छत्रपतींच्या घराण्याचे ऐतिहासिक वर्णन आहे व प्रकरण तीन ते नऊ मध्ये राज्य प्रशासनाचेकार्य व त्याचे महत्त्व व कशा प्रकारे ही राज्यघटना अमलात आणावी यासंबंधीत आदेश व सुत्रबध्द निवेदन व सूक्ष्म विचार जाणवतात.

या आज्ञापत्रात मराठेशाहीची राजनिती असे संबोधले जाते. या प्रशासन यंत्रणेमध्ये स्वराज्याचे प्रशासकीय तीन विभाग केलेले आढळतात. एक तळघाट, दोन वरघाट व उर्वरित देश असे तीन विभाग केलेले आढळतात आणि मंत्रीमंडळात प्रधानाला सरकारकून हा अतिरिक्त अधिभार देऊन त्याची त्या पदावर नेमणूक केली जात असे. आणि त्या विभागाची प्रशासकीय जबाबदारी संपूर्णपणे सरकारकूनावरच असे. ही परंपरा छ. शाहू महाराज (छ. संभाजी पुत्र) पर्यंत चालू होती. छ. शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय राज्ययंत्रणेमध्ये राजांनी कसे वागावे, कसे बोलावे, राजघराणे म्हणजे नेमके काय, राजाने राज्यव्यवस्था कशी करावी, राज्यातील सावकार म्हणजे कोण व त्यांचे राज्यासाठी काय उपयोग करून घ्यावा, व्यापार निर्मिती कशी करावी, कोणाशी कसा व्यापार करावा, वतनदार मंडळींची नेमकी कामे काय, त्यांच्याकडून राज्याकरिता काय अपेक्षा आहे, वतनदाराच्या कक्षा राजांनी कशा ठरवाव्यात, त्यांची धार्मिक वृत्ती कशी आहे, राजाने इनामे कोणास द्यावे, राज्यातील गड, कोट, दुर्ग यासंदर्भात महत्त्वाच्या सुचना नव्हे आज्ञा कारण गड हे राज्याचे सार आहे. एकंदर प्रशासन यंत्रणा कशी राबवावी, यासंदर्भातील राजआज्ञा व सर्वांत महत्त्वाचे आरमार त्यासंदर्भात संपूर्ण सावधानता इ. स्वरूपाच्या आज्ञा व प्रबंध यासंदर्भात आज्ञापत्र मार्गदर्शक स्वरूपात राजाज्ञाच असे.

प्रशासकीय कार्ययंत्रणा छ. शिवाजी महाराजांच्या मनात होती, ती प्रत्यक्ष कार्यरत होती. परंतु लिखीत स्वरूपात लिहिण्यास त्यांच्या कालखंडात जमले नाही. ती इच्छा रामचंद्रपंत अमात्य यांचेकडे बोलून दाखविली असता व कालांतराने योग्य वेळ येताच म्हणजे छ. राजारामांचे पुत्र छ. संभाजी (दुसरे) यांच्या आग्रहास्तव लिहून काढली असे दिसते. हे रामचंद्रपंत अमात्य यांनी पाच छत्रपतींच्या बरोबरीत काम केलेले होते.

१. छ. शिवाजी महाराज, (स्वराज्य संस्थापक)
२. छ. संभाजी महाराज (स्वराज्य संरक्षक)
३. छ. राजाराम महाराज (स्वराज्य विस्तारक)
४. छ. थोरले शाहू महाराज (स्वराज्य वर्धक)
५. छ. संभाजी महाराज - दुसरे छ. राजाराम पुत्र

या सर्वांबरोबर यांनी काम केले. ते रामचंद्रपंत अमात्य वय वर्षे २३ ते वय वर्षे ६३ अंदाजे ४० वर्षे स्वत: भोसले घराण्याची सेवा त्यांनी केली व महाराष्ट्रातील एकमेव प्रशासकीय अधिकारी एवढी दीर्घ सेवा करणारा भोसले घराण्याला लाभला. त्यांनी या पाचही राजांच्या बरोबरीने व महाराणी ताराबाई यांच्याबरोबर राज्यकारभार केला.[३]

रामचंद्रपंत अमात्य यांच्याबद्दल पुणतांबेकर एस. व्ही., प्रिन्सीपल ऑफ मराठा स्टेट पॉलिसी या लेखकांनी लिहून ठेवलेले संदर्भ.

Ramchandrapant was one of the most able administrators and statesmen of Shivaji's time. A contemporary chronicle of Shivaji. Krishnaji Anand Sabhasad, has mentioned in his bakhar. the last wish of Shivaji which was : " should the

Maratha kingdom break up, three Brahmans, namely. Pralhadpant, Ramchandrapant and Nilopant the sons of his three trustworthy counselor – administrators, and three Maratha Sardars, Santaji, Baji Ghorpade and Dhanaji Jadhav would alone be able to save it. The Bakharkar further adds the 'Ramchandrapant would become famous in future.''

छ. शिवाजी महाराजांची राज्ययंत्रणा स्थिर व सुखकारक होती. हे **न्यायमूर्ती महादेव रानडे यांनी असे वर्णन केले आहे, मराठ्यांचे स्वराज्य छ. शिवाजींनी निर्माण केले आणि ते टिकले याचे कारण राज्य प्रशासन यंत्रणा व या यंत्रणेमुळे महाराजांना पराक्रमाची इमारत उभी करता आली.**

याचा अर्थ प्रशासकीय कार्य यंत्रणा जेवढी प्रभावी व सूक्ष्म असेल तेवढे यश अधिक मिळणार आणि हिच गोष्ट शिवाजी महाराजांनी जाणली होती व कृतीत आणली होती. म्हणूनच बस्तान बसलेल्या मोगल्यांच्या राज्याला त्यांनी नामोहरम करून स्वराज्य निर्माण केले. यामुळेच त्यांची यंत्रणा किती प्रभावी होती व प्रशासकीय कामातून त्यांना अष्टप्रधान मंडळाबरोबर काही महत्वाचे निर्णय घेता आले.[४]

आता आपण प्रत्यक्ष मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेची राज्यघटना या थोडक्यात अभ्यास खालील प्रमाणे (आज्ञापत्राच्या पहिल्या दोन प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्यासंदर्भातला इतिहास आहे व प्रत्यक्ष आज्ञा प्रकरण तीन पासून चालू होतात. त्यापुढीलप्रमाणे) :-

**राजा व राजधर्म**

**राजा व राजधर्म यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने**

**संकल्पना :-**

१. राजा व राजधर्म यासंदर्भात राजाची धर्मविषयक कर्तव्ये प्रज्ञावंत व गुणवंतांचा संगम, युध्दनितीचां अभ्यास, राज्याचे अर्थकारण, आपल्या मंत्र्यांचा सल्ला व राजकुमारांचे प्रशिक्षण या तीन गोष्टींसंदर्भात आज्ञा देताना राजाने स्वतः धर्माचरणी दृढ राहून राज्यांतील देवस्थाने यांना उत्पन्ने करून द्यावीत व राज्यातील सद्पुरूषांचे योक्षेम चालवून त्यांचा आशीर्वाद संपादित करावा.

२. राजाने स्वःशरीर संरक्षणासंदर्भात सावध राहून स्वतःजवळ अत्यंत विश्वासू व शूर शुभलक्षणी सेवक ठेवावे.

३.मादक द्रव्य सर्वथैव भक्षू नये.

४.सैनिकांकरीता सामुग्री व हत्यारी ही स्वतः पूर्णपणे अवगत करून ठेवावीत. म्हणजेच ही सर्व हत्यारे स्वतःला चालविता आली पाहिजेत.

५.राज्यकारभार करताना लोकांचे हित हे मुख्य साध्य आहे, त्यामुळे दरबारात नृत्य, गायक करू नये व चित्त आसक्त होईल असे कृत्य करू नये.

६.पहाट किंवा कवी यांना आश्रय द्यावा, परंतु त्यांचा राज्यकारभारात प्रवेश होऊ देऊ नये.

७.राजे लोकांनी दरबारामध्ये विनोद प्रवृत्ती ठेऊ नये. आपल्याच शहाणपणावर न जाता त्या कार्यात जे बुध्दीमान असतील, त्यांचाच सल्ला घ्यावा.

८.राज्याचा खजिना नित्य नूतन वाढवावा. त्या कामामध्ये नेहमीपेक्षा जास्त विशेष कार्य केले असेल, त्यास अधिक वेतन देऊ नये.

९.आपल्या राज्यातील दुर्ग संरक्षणाकरिता निवडक व शूर आणि त्या योग्यतेची माणसे ठेवावीत.

१०.सैनिकांमध्ये शिस्त कडक ठेवावीत. परंतु उत्तम काम केल्यावर त्याचे म्हणजेच सर्व सैनिकांचे कौतुक करावे. त्यांच्यावर लोभ करून ते निष्ठावान राहतील, असे करावे.

११.स्वराज्य रक्षणासाठी लागणारी सर्व शस्त्रे, विविध प्रकारची हत्यारे व युध्दसामुग्री सदैव सज्ज ठेवावी.

१२.आपल्या अवगुणांचा त्याग करून निश्यकपटपणे मनुष्य संग्रह जास्तीत जास्त करावा.

१३.सेवक किंवा चाकर ठेवताना निटपणे पारखून त्यांच्याबद्दल एखादा सैनिक किंवा अधिकारी जामीन ठेवून मग त्यास सेवक किंवा चाकर म्हणून ठेवावा.

१४.कोणत्याही सेवकाचा दोष स्वतःच्या मुखाने सर्वासमोर उच्चारू नये.

१५.राजकुमारांच्या शिक्षणाची उत्तम सोयी ठेवावी. त्यांना सर्व विद्येत निपुण ठेवावे. त्याकरिता निपुण व पारंगत शिक्षक नेमावेत.

१६.सूक्ष्म विचारवंत आणि निस्पृह असे माणसे आपल्याजवळ सतत ठेवावीत. जेणेकरून आपल्या हातून काही गैर घडल्यास आपली कानउघडणी करण्याकरिता त्यांना स्वतःहून अधिकार द्यावा.[५]

१७.राजे लोकांनी खूप सोशीक राहून सेवकांच्या दोषाबद्दल सहिष्णूता धारण करावी.

१८.राजसभेमध्ये काही ज्येष्ठ लोकांनी संताप व अर्वाच्यपणा केल्यास त्यासमयी शांतता धरून त्यांच्या संतोषाकरिता हास्यवदन करावे. कौशल्याने व शहाणपणाने त्यांचे पारिपत्य करावे.

### प्रधान

### प्रधानाच्या संदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

**संकल्पना :-** आज्ञापत्राच्या चौथ्या प्रकरणात प्रधान व त्याचे कार्य ही संकल्पना स्पष्ट करून सूचना रूपी आज्ञा दिलेल्या आहेत. याठिकाणी प्रधान याचा अर्थ अष्टप्रधान असा महाराजांना अभिप्रेत आहे. अष्टप्रधान मंडळात प्रधान, सेनापती, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंतन्यायाधीश व पंडीतराव यांचा समावेश असे. अष्टप्रधान म्हणजे फक्त कामाची विभागणी नव्हे तर प्रसंगी राजास योग्य सल्ला देणारे व राजास आवर घालणारे व राजाची सत्ता आणि किर्ती वाढविणारे असे सर्व राजबंधुंच होते. ही मूळ कल्पना या राजआज्ञाच्या पाठीमागे दिसते. त्यातील महत्त्वाच्या आज्ञा आपण बघू.

१.प्रधान हेच राज्यलक्षण गृहाचे आधारस्तंभ आहेत.

२.प्रधानांनी शासन चालविताना आपल्या चित्तामध्ये संपूर्ण राज्य लक्षात ठेवून राज्यकारभार करावा.

३.प्रधान म्हणजे सरकारकून, मनुष्य परिक्षा करून नियोजित कार्य धुरंधर पाहून मगच सरकारकूनी करावी.[६]

४.कुलीन व राजधर्म विशारद असून जर अवगुणी कुणी असेल त्याची नेमणूक करू नये.

५.प्रधानाची अवगणना कधीही करू नये. काही दोष घडल्यास त्याची वाच्यता न करता युक्तीने दोष सांडवावा.

६.प्रधानास मुतालिक देणे (वारसदार नेमणे) अशी वेळ आल्यास अगोदरच्या प्रधानाच्या अंगी असलेल्या गुणांनी संपन्न असावा.

७.संपूर्ण राज्यकारभार देश दुर्गाच्या कार्याची व्यवस्था प्रधानाच्या हाती द्यावा व सेना नायकास त्याच्या अधीन ठेवावे.

८.केवळ प्रधानाच्या ओंजळीने राजाने पाणी न पिता, राजाने राज्यकारभाराविषयक वर्तमान स्वतंत्रपणे हाताळावीत.

९.केवळ एक प्रधानाच्या हाती सर्व कारभार असू नये. त्याचबरोबर अनेक सरकारकून (प्रधान) व सेनानायक असावेत. (पायदळ, घोडदळ व नाविकदळ)

### साहुकार

### साहुकार यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

**संकल्पना :-** आज्ञापत्राच्या पाचव्या प्रकरणात साहुकार (व्यापारी) या संदर्भातील सूचनावजा आज्ञा आहेत. साहुकारांचे राज्यातील स्थान व त्यांचे महत्त्व या संदर्भात राज्यसंरक्षण कसे केले जाते, अशा संदर्भाच्या आज्ञा आहेत. राज्यकारभारासाठी जे आर्थिक बळ लागते. ते व्यापारी वर्गाकडून मिळते. म्हणून आपल्या राज्यातील साहुकारांचे संरक्षण करणे हे महत्त्वाचे ठरते. त्यासंदर्भात दिलेल्या सूचनावजा आज्ञा कशा आहेत ते बघू.

१.साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रींची शोभा. याकरीता साहुकारांचा बहुमान चालवावा व त्यांना संतुष्ट राखून सर्व प्रकारच्या वस्तुंचा व्यापार राज्यात करावा.

२.इंग्रज, फ्रेंच इ. टोपीकर हेही साहुकारी (सावकारी) करतात पण ते इतर भारतीय साहुकारांमध्ये नव्हेत. आपल्या स्वतःचे राज्य वाढवावे. स्वतःची प्रतिष्ठा वाढवावी, याबद्दल टोपीकरांना अभिमान आहे, म्हणून त्यांना जागा कदापीही देऊ नये.

३.नदीकाठावर किंवा खाडीच्या तोंडावर टोपीकर सावकरांना मुळीच जागा देऊ नये.

४.शत्रूच्या मुलखातील साहुकार सापडले तर त्यांना खंड करून त्यांचा बहुमन करावा व त्यांना शासन करू नये.

५.इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डेन्स व मोगल यांच्यातील साहुकारांना (सावकारांना) शहरामध्ये जागा देऊ नये. शहरापासून लांब जागा द्यावी व त्यांना इमारत बांधून देऊ नये.

एकंदरीतच या आज्ञांमुळे प्रशासकीय कार्ययंत्रणेतील छ. शिवाजी महाराजांची दूरदृष्टी दिसून येते व या आज्ञेचे तंतोतंत पालन जर पुढील राजांनी केले असते तर इंग्रजांनी किंवा ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य केले नसते.

### 'वतनदार'

### वतनदार यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

**संकल्पना :-** मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये वतनदार हा नेहमीच महत्त्वाचा घटक असल्यामुळे समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यासाठी वतनाधिष्ठीत गावसत्ता ही कायमस्वरूपी असल्याने सतत बदलणाऱ्या राजसत्तेपेक्ष वतनदारांच्या अधिपत्याखाली असलेली ग्रामयंत्रणा ही अत्यंत महत्त्वाची होती.[७] हे तत्त्व छ. शिवरायांपासून ते आतापर्यंतच्या संस्थानिकांपर्यंत लक्षात आले होते. त्यामुळेच एकेठिकाणी जेधे देशमुख छ. शिवरायांना म्हणतात, हे महाराष्ट्र राज्य आहे, अवघीयांनी हिंमत धरून स्वामी सानिध्य केले पाहिजे. अशा स्वरूपाचे उद्गार काढून छ. शिवरायांना अफजलखानाच्या मोहिमेत मदत करून त्यांच्या पाठीशी उभे राहिले. यावरून आपल्याला असे दिसते की, वतनदारांची मने राजाने सांभाळली होती व त्यांना ते या देशाचा देशनायकच म्हणत असत. यासंदर्भातल्या आज्ञा

अशा,

१.राज्यातील वतनदार देशमुख, देशकुलकर्णी व पाटील आदी करून हे राज्याचे दायदाद आहे.

२.राजाशी निष्ठेने वर्तावे ही यांची बुध्दी नाही. वतन लोभाने हे परसत्तेच आश्रय घेतात. या दोषांकरिता यांच द्वेष करून वतने बुडवू नयेत पण त्यांचे जास्त लाडपण करू नयेत.

३.उच्छ्रंखल वतनदारास कठीण कार्यावर पाठवून त्यांच्या वृत्तीचा नाश होईल, असे पाहावे.

४.वतनदारास बाह्यत: खुष ठेवावे. पण अधून-मधून त्याच्याकडून द्रव्याची (संपत्ती) मागणी करून त्याला हालकेच करत रहावे.

५.वतनदारांमध्ये कार्य करणारा एखादा प्रामाणिक वतनदार असेल, (उदा. जेधे देशमुख) तर त्यास आदर देऊन संग्रह करावा.

**'वृत्ती आणि इनामे'**

**वृत्ती आणि इनामे यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने**

**संकल्पना :-** वृत्ति म्हणजे निर्वाहाचे साधन म्हणून राजाकडून दिलेले दान असते. इनाम म्हणजे इनाम म्हणून दिलेली जमिन एखाद्या व्यक्तीने केलेल्या कार्याबद्दल बक्षिस म्हणून दिलेली असते. इनामकीच्या जमिनीला सरकारी सारा माफ असतो. तसा उल्लेख इनामकीच्या पत्रात केलेला असतो. वृत्ति या संकल्पनेत धार्मिक कार्यासाठी दिलेली जमिन म्हणजे धर्मार्थ भूमिदान करणे, याचे पुण्य अनंत आहे. अशा धारणेने सुध्दा काही ठिकाणी देवस्थानाकरिता उदरनिर्वाहाचे साधन म्हणून राजाकडून दिलेली असते. यासंदर्भात आज्ञा अशा,

१.वृत्तिलोप करणे हे परमपातक आहे. वृत्तिवंताने महद अपराध जरी केला तरी त्यास शासन करावे, परंतु वृत्ति काढून घेऊ नये.

२.सेवक लोकांनी सेवा उदंड केली तरी त्यास नवीन वृत्ति करून देऊ नये. ज्यास वृत्ति करून दिली त्यांचे वंशज हरामखोर निघाल्यास राज्यास अपाय होतो, तेव्हा नूतन वृत्ति कोणास करू देऊ नये.

३.विशेष कार्य केल्यास जर सगळयांनाच भूमी इनाम दिल्या तर राज्य कशाच्या आधारावर करणार याकरिता सरसकट इनामकी वाटत बसू नये.

४.धर्मकार्यार्थ भूमि देणे, थोर देवस्थाने अथवा थोर सत्पुरूषांचे मठ यांच्याकरिता धर्मार्थ सूक्ष्म विचार करून त्यांना भूमी द्यावी.

५.एकदा भूमी दान दिल्यावर त्यावर मात्र स्वतःवर प्राणांत संकट जरी ओढवले तरी दिलेल्या इनामकीमध्ये आचमनभर पाण्याची सुध्दा आशा ठेऊ नये.

## संदर्भ ग्रंथ सूची


१.ढेरे आर. व्ही. भोर संस्थान, १६९० ते १९४८, २००५, पुणे सुयश प्रकाशन, पृष्ठ क्र. १८ ते २०

२.जोशी प्र. ना. १९६०, पुणे, आज्ञापत्र, मराठेशाहीतील राजनिती, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ६९

३.कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, मोडी - मराठी -इंग्रजी, २००७, पुणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३०, पृष्ठ क्र. ३२१

४.देशपांडे सौरभ, अमात्यांचे आज्ञापत्र आणि भारतीय संविधान, २०११, पुणे, गो.नि.दांडेकर प्रकाशन, पुणे ९, पृष्ठ क्र..

५.बनहट्टी श्री. ना., आज्ञापत्र, १९६१, नागपूर, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-१२, पृष्ठ क्र. ७०

६.देशपांडे प्र. न., आज्ञापत्र, मराठेशाहीतील राजनिती, २००५, पुणे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस क'. ५२२, पुणे, पृष्ठ क्र. ४०

७.कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, मोडी, मराठी, इंग्रजी, पुणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे-३०, पृष्ठ क्र. ५९

८.बनहट्टी ना. श्री., आज्ञापत्र, नागपूर, १९६१, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन मंडळ, धतोली, नागपूर-१२, पृष्ठ क्र. ९९

९.मराठेशाहीतील राजनिती, आज्ञापत्र, जोशी प्र. न., १९६०, पाध्ये स. कृ., व्हीनस प्रकाशन, पुणे-२, पृष्ठ क्र. ३६

१०.कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, मोडी, मराठी, इंग्रजी, पुणे, २००७, डायमंड पब्लिकेशन, पुणे-३०, पृष्ठ क्र.६८


११.बनहट्टी ना. श्री., आज्ञापत्र, नागपूर, १९६१, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन मंडळ, धतोली, नागपूर-१२, पृष्ठ क्र. ११३




## छत्रपति शिवाजी महाराज


(सुरतच्या लुटीसमयी १६६४ इ.स. अखेर)
डच चित्रकाराने प्रत्यक्ष पाहून काढलेले चित्र - व्हॉन व्हलेटीन संग्रह, हेग

संदर्भ ग्रंथ :
**बेंद्रे वा. सी., मालोजीराजे आणि शहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे, १९६७, मुंबई**
प्रकाशक : वा. सी. बेंद्रे, पुणे ४.



श्री मन्महागणाधिपतये नमः
श्री मन्महासरस्वत्यैनमोनमः
श्री सांब परब्रह्मणेनमोनमः
श्री म्हाळसाकांत मल्हारी मार्तंडाय नमः
स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४२ मन्म
थ नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी गुरु
वासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रप
ती स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंदर विश्वास

संदर्भ ग्रंथ :
कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, मोडी-मराठी-इंग्रजी, A JNA - PATRA, २००७, पुणे विद्यापीठ, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे ३०, पृष्ठ क्र. ८४ ते ८७



निधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित आमात्य हु
कुमतपन्हा यास आज्ञा केली वैसीजे स्वामी रा
ज्यासनारूढ जाहले आसता सर्वांची समाधाने केली रा
ज्याचा सर्वही अर्थ मनास आणीला त्यास सकळही लाहन
थोर सेवक राज्याचे विज्वर प्रसंगामुळे कितेक आपलाले
योगक्षेम विषयी कुंठीतबुद्धि व हतवैर्य जाले ज्यां
णी परंपरेने यकनिष्ठपणे सेवा करून या राज्यात आपल्या
नाम्ना संपादिल्या ऐसीही कितेक सेवक होते त्याणी
अवसाने सोडून परंपरागत मेळवीले अधिकाराची प

संदर्भ ग्रंथ :
कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, मोडी-मराठी-इंग्रजी, A JNA - PATRA, २००७, पुणे विद्यापीठ, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे ३०, पृष्ठ क्र. ८४ ते ८७